# महाराष्ट्र शासन
# जिल्हाधिकारी कोल्हापूर
# जाहिर निविदा सूचना

जिल्हा प्रशासनाच्या अखत्यारितील जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कामात पारदर्शकता आणणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि शिधापत्रिका धारकांना नियमित व वेळेवर शिधावस्तू पुरविणे या कामाकरिता मा. प्रधान सचिव यांचेकडील अ.शा.प्र.क्र. सीव्हीसी/२०११/प्र.क्र.११७/नापु ३६, दि. १७/११/२०११ नुसार सदरची डाटा एंट्री करणेकरीता www.nic.in/ercmsercms या शासनाच्या संकेतस्थळावर डाटा एंट्री करणे कामी खाजगी तत्वावर डाटाएंट्री ऑपरेटर्स किंवा डाटाएंट्री पुरविणाऱ्या संस्थेस देणे आहे. या करीता सर्व्हिसेस पुरविणेसाठी अधिकृत कंपनी / संस्थाधारक इ. यांच्याकडून दोन लिफाफा पद्धतीने जाहिरात निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | परिशिष्ट | साहित्य खरेदी प्रकार | निविदा प्रपत्र किंमत | ई. एम. डी. रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | परिशिष्ट १ | ऑनलाईन शासकीय संकेत स्थळावर डाटा एंट्री करणे | १०,०००/- | १००,०००/- |

टीप :- कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत रु. १०,०००/- असून सदरची रक्कम नापरतावा आहे.

निविदा प्रपत्र खरेदीकरीता इच्छूक निविदाधारकांनी प्रत्यक्ष लेखी मागणी करणेची आहे.

कोऱ्या निविदा प्रपत्र दि. ३/०१/२०१२ ते १०/०१/२०१२ या कालावधीत सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत कार्यासन क्र. २०(६) राभादु, जिल्हा पुरवठा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे विक्रीस उपलब्ध होतील. निविदा प्रपत्र भरुन देणेची अंतिम तारीख १०/०१/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहिल. निविदा शक्यतो त्या
च दिवशी उपस्थिती निविदाधारक यांचेसमक्ष दुपारी ४.०० वाजता उघडणेत येतील. प्रथम पहिला तांत्रिक लिफाफा उघडणेत येईल त्याची पूर्तता झालेवर दुसरा निविदा किंमतीचा (Commercial Bid)लिफाफा उघडून निविदा अंतिम केली जाईल.

सहकारी संस्था निविदा भरणेकरीता उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा प्रक्रीया स्थगित ठेवणेचा अधिकार जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही. अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.

कोल्हापूर
दिनांक - २/०१/२०१२

जिल्हाधिकारी, कोल्हापूर